# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

ई-मेल / टपालाद्वारे

क्रमांक- रानिआ/रापनों-२०२०/प्र.क्र. १/का.११
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ९ जानेवारी, २०२०

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
(सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष)

**विषय** :- राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत राजकीय पक्षांसाठी महत्त्वाचे निर्देश

संदर्भ :- १) एसईसी/२००९/सीआर-४९/का.११, दि. ३१ मार्च, २००९ चे आदेश
२) आयोगाचे क्र. रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि. १५ ऑक्टोबर, २०१६ व दि. २५ ऑक्टोबर, २०१६ चे आदेश.
३) आयोगाचे क्र. एसईसी/आरपीपी-२०१७/सी.आर.०७/का.११, दि. २१ जानेवारी, २०१७ चे आदेश.
४) आयोगाचे क्र. रानिआ/रापनों-२०१८/प्र.क्र.८/का.११,दि. २५ जुलै, २०१८ चे आदेश.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाकडे सध्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय नोंदणीकृत मान्यताप्राप्त तसेच इतर नोंदणीकृत अमान्यताप्राप्त अशा एकंदरीत २६३ पक्षांची नोंदणी झालेली आहे. या पक्षांच्या कामकाजाबाबत आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशासंदर्भात पक्ष पातळीवर काही प्रमाणात अनभिज्ञता व संभ्रम असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

२. सबब, यासंदर्भात पुढील बाबी सर्व राजकीय पक्षांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत :-

i) आयोगाच्या उक्त संदर्भ क्र. २ च्या आदेशानुसार ग्रामपंचायत वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पक्षातर्फे अंतिमत: निवडणूक लढविलेल्या उमेदवारांसाठी पक्षाने केलेल्या खर्चाचा तपशील महानगरपालिकेसंदर्भात संबंधित महानगरपालिका आयुक्त तसेच

जिल्हापरिषद, पंचायत समिती, नगरपरिषदा व नगरपंचायतीसंदर्भात संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांकडे निवडणुकीचा निकाल लागल्याच्या दिनांकापासून २० ते ६० दिवसांच्या आत (पक्षातर्फे प्रपत्र अ व ब देण्यात आलेल्या, माघार घेणाऱ्या व विजयी झालेल्या उमेदवारांचा तपशील, निकालापासून २० दिवसांच्या आत ) तर स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय एकूण निवडणूक खर्चाचा तपशील निकाल लागल्यापासून ६० दिवसांच्या आत सादर करुन त्याची पोचपावती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात सर्व पक्षांनी आपल्या स्थानिक कार्यालयांना निर्देश देणे आवश्यक आहे. याबाबत सविस्तर तपशील आयोगाच्या क्र. रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.०४/का.११, दि.२० ऑक्टोबर, २०१६ च्या आदेशात नमूद करण्यात आला आहे.

ii) उक्त संदर्भ क्र. ३ च्या आदेशात एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षास एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी त्यांच्या पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मुक्त चिन्हांच्या यादीतील तात्पुरते एक सामाईक निवडणूक चिन्ह हवे असेल तर त्यांनी या आदेशात नमूद केलेल्या प्रत्येक अटी व शर्तीचे पालन करुन नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापासून किमान ३ दिवस आधी परस्पर त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे अनिवार्य आहे. अशा पक्षाने प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र अर्ज करणे अभिप्रेत आहे.

iii) आयोगाच्या उक्त संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ मध्ये सुधारणा करण्यात आली असून सदर आदेशाच्या परिच्छेद ४ (१) (ड) नंतर नोंदणीकृत राजकीय पक्षांनी सदर सुधारणा आदेशाच्या दिनांकापासून (दि. २५ जुलै, २०१८ पासून) / पक्षाच्या नोंदणीच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीत ग्रामपंचायत वगळता इतर कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान एक उमेदवार निवडणुकीमध्ये अंतिमत: उभा करणे अनिवार्य आहे.

तसेच नोंदणीकृत राजकीय पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्यावेळी मतदारांसाठी जाहीरनामा प्रसिध्द केला असल्यास त्यातील आश्वासनांच्या पुर्ततेचा वार्षिक अहवाल जनतेच्या माहितीसाठी जाहिरातीद्वारे अथवा पक्षाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे आवश्यक असून त्याची एक प्रत

संबंधित महानगरपालिका आयुक्त / संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे अनिवार्य असे याची नोंद घ्यावी.

iv) राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी सुचित केल्यानुसार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या नावातील बदल, पक्षाच्या पत्त्यातील बदल याबाबत आयोगास वेळोवेळी सुचित करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या पक्षाचे संपर्क क्रमांक, पक्षाचे अधिकृत ई-मेल आयडी व वेबसाईट याबाबतचा तपशील आयोगाच्या sec.mh@gov.in या ई-मेल वर दि. १५ फेब्रुवारी, २०२० पर्यंत सादर करावा.

v) सदर पत्र तसेच वर नमूद करण्यात आलेले सर्व आदेश आयोगाच्या www.mahasec.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी -

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) महानगरपालिका आयुक्त (सर्व)
३) जिल्हाधिकारी (सर्व)
४) मा. आयुक्त यांचे स्वीय सहायक
५) मा. सचिव यांचे स्वीय सहायक
६) राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने (कार्या.८ वगळून).

या निर्देशपत्राचा उल्लेख या पुढील सर्व निवडणूक पूर्वतयारी विषयक व प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमामध्ये आवर्जून करण्यात यावा.

७) सहायक आयुक्त (जनसंपर्क)
८) निवड नस्ती.

C:\...docx